संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१४६/२०२३
नि.क्रं. १०/सी

**सरकारी पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ शपथेवर कथन करतो की-**

माझे नाव - अमर सुभाष पाटील
वय - ३५ वर्षे, व्यवसाय - नोकरी
राहणार - आवळी ता. पन्हाळा, जि: कोल्हापूर

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस.बी.कांबळे यांचे मार्फत -**

**१.** दि.१६/०८/२०२३ रोजी मी राज्य उत्पादन शुल्क राधानगरी, येथे जवान म्हणून कार्यरत होतो. सदरील दिवशी दुय्यम निरिक्षक राक्षे साहेब यांना मिळालेल्या अवैध दारु विक्रीच्या गुप्त माहितीनुसार खिंडीव्हरवडे येथे छापा टाकला. दोन पंच, मी, राक्षे साहेब आणि रेडिंग स्टाफ असे खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो. सदरील ठिकाणी एक इसम आपले कब्जेत प्लॅस्टीक कॅन त्यामध्ये अंदाजे ३२ लीटर गावठी हातभट्टी दारु ,एक प्लॅस्टीक मग आणि चार काचेचे ग्लास असा एकूण मुद्देमाल रक्कम रु.१७९०/- चा मिळून आला. साहेबांनी त्याचेकडे चौकशी केली असता दारू विक्रीचा कोणताही परवाना नसलेचे त्यांनी सांगितले. साहेबांनी त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव आकाश रामदास तमायचेकर असे सांगितले.

**२.** सदरील मुद्देमाल जप्त केला. त्यातील दोन बाटल्या नमुणा पथकरणासाठी साहेबांच्या व पंचाच्या सहीचा कागद लावून लाखी सिल ने बंद केला. पंचनामा करून जप्त मुद्देमाल साहेबांनी आपले कब्जेत घेतला. कार्यालयात मी घडले प्रकाराबाबत रीतसर फिर्याद दिली. आता मला ती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.११/PW1** देण्यात येते. मी आरोपीला

पाहिल्यास ओळखू शकतो.आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही. मुद्देमाल पाहिल्यास ओळखू शकतो.

<u>**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ वकील श्री.यु.एम.मानकर यांचे मार्फत -**</u>

**३.** हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी न्यायालयासमोर मुद्देमाल हजर नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही स्थानीक पंच घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, या कामातील पंचांनी राज्य उत्पादन शुल्कच्या अनेक कामांमध्ये पंच म्हणून काम पाहिलेले आहे. आम्ही आरोपीकडे कोणीही बोगस गि-हाईक पाठवले नव्हते. आरोपीकडे सदरील वेळी दारू पिणारे कोणी मिळून आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ रिकामी जागा असलेमुळे त्या जागेवर कोणीही येऊ-जाऊ शकते.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटा मजकूर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बेकायदा दारू विक्रीच्या केसेस आम्ही दाखल करतो. हे म्हणणे खरे नाही की, केसेस दाखविणेकरीता आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दाखल करून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

राधानगरी (एन. पी. काकडे)

दिनांक.०५/११/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी.